# विनाअनुदानित असोसिएशन अध्यक्षपदी समीर वाघ

नाशिक : प्रतिनिधी

राज्यातील विनाअनुदानित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि कृषी



व कृषी संलग्न महाविद्यालये या तिन्ही राज्यस्तरीय असोसिएशनच्या अध्यक्षपदी के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांची बिनविरोध निवड झाल्याचे असोसिएशनने एका पत्रान्वये कळविले आहे.

विनाअनुदानित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तिन्ही राज्यस्तरीय नोंदणीकृत संस्था आहेत. विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये २५०, विनाअनुदानित तंत्रनिकेतनचे २०२ आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयाचे ९६ इतक्या महाविद्यालयांची आजमितीस सभासद संख्या आहे. या तिन्ही असोसिएशनची स्थापना सुमारे २० वर्षांपूर्वी झालेली असून, असोसिएशनचे दिवंगत अध्यक्ष बाळासाहेब देवराम वाघ हे असोसिएशनच्या स्थापनेपासून अध्यक्षपद भूषवित होते. त्यांच्या कार्यकाळात अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयांचे विविध प्रश्न सुटलेले आहेत. विनाअनुदानित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तिन्ही असोसिएशनच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये समीर बाळासाहेब वाघ यांची संस्थेच्या व्यवस्थापन प्रतिनिधींनी बिनविरोध निवड केली.


# त्र्यंबकला २९ रोजी महामृत्युंजय महायज्ञ

नाशिक : प्रतिनिधी

श्रीतीर्थ सेवा समिती नाशिकच्या वतीने खास शिवभक्तांसाठी दि. २९ मे रोजी श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे सकाळी ६ ते सायंकाळी ४ या दरम्यान महामृत्युंजय महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांना सर्व दृष्टीने सुरक्षितता लाभावी, त्यांचा परिवार, कुटुंब दुर्धर आजार, व्याधी आणि विविध समस्यांनी मुक्त राहावा, त्यांना सुख, शांती मिळावी, त्यांची भरभराट व्हावी, या हेतूने समितीच्या वतीने या महामृत्युंजय महायज्ञाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संयोजकांनी दिली. भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी आद्य ज्योतिर्लिंग असलेल्या श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वराचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. या तीर्थक्षेत्री झालेला विधी अधिक फलदायी ठरतो.

# राज्यस्तरीय विनाअनुदानित असोसिएशनचे वाघ अध्यक्ष

नाशिक, ता. २२ : महाराष्ट्रातील विनाअनुदानित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तिन्ही राज्यस्तरीय असोसिएशनच्या अध्यक्षपदी के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांची बिनविरोध निवड झाली आहे.



**समीर वाघ**

तिन्ही राज्यस्तरीय नोंदणीकृत संस्था आहेत. विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये २५०, विनाअनुदानित तंत्रनिकेतनचे २०२ आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयाचे ९६ इतक्या महाविद्यालयांची आजमितीस सभासद संख्या आहे. या तिन्ही असोसिएशनची स्थापना सुमारे वीस वर्षांपूर्वी झालेली असून, असोसिएशनचे दिवंगत अध्यक्ष बाळासाहेब देवराम वाघ हे असोसिएशनच्या स्थापनेपासून अध्यक्षपद भुषवित होते. त्यांच्या कार्यकाळात महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयांचे विविध प्रश्न त्यांच्या नेतृत्वात सुटलेले आहेत. या तिन्ही असोसिएशनच्या विशेष सर्वसाधारण सभेत के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल आमदार शेखर निकम (रत्नागिरी), अमित कोल्हे (कोपरगांव), माजी आमदार कृष्णरावजी इंगळे (बुलढाणा), डॉ.एस.ए. हलकुडे (सोलापूर), ए.जी. मेहेर (नारायणगांव), सुशांत व्ही. पाटील (पुणे), अनिल ए. बागणे (कोल्हापूर), पी.एम. वादाफळे (यवतमाळ), कृष्णा जी. अंधारे (अकोला), डॉ.पी.पी.वीटकर (पुणे), अनिता एस. ढोबळे (सोलापूर) व आदींनी अभिनंदन केले आहे.

# समीर वाघ यांची निवड



**नाशिक :** महाराष्ट्रातील विनाअनुदानित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तिन्ही राज्यस्तरीय असोसिएशनच्या अध्यक्षपदी के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांची बिनविरोध निवड झाली आहे. २५० विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, २०२ विनाअनुदानित तंत्रनिकेतन महाविद्यालये तसेच ९६ कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये असोसिएशनचे सदस्य आहेत. असोसिएशनची स्थापना सुमारे २० वर्षांपूर्वी झालेली असून, असोसिएशनचे दिवंगत अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी स्थापनेपासून अध्यक्षपद भूषविले होते. आमदार शेखर निकम, अमित कोल्हे, कृष्णराव इंगळे, डॉ. एस. ए. हलकुडे, ए. जी. मेहेर, सुशांत पाटील, अनिल बागणे, पी. एम. वादाफळे, कृष्णा अंधारे, डॉ. पी. पी. बीटकर, अनिता ढोबळे आदींनी वाघ यांचे निवडीबद्दल अभिनंदन केले.



**नाशिक :** महाराष्ट्रातील विना अनुदानित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तिन्ही राज्यस्तरीय असोसिएशनच्या अध्यक्षपदी के के वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे अधिष्ठाता डॉ. पी. एन. रसाळ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शाल व पुष्पगुच्छ देऊन समीर वाघ यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी धुळे च्या कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ सी डी देवकर, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे उद्यानविद्या विभागाचे विभागप्रमुख डॉ. एस. ए. रनपिसे, तांत्रिक अधिकारी डॉ. आर. पी. आंधळे, सहाय्यक रजिस्ट्रर एच. डब्ल्यू. सोनार, कार्यालय अधिष्ठाता डी वी भोसले, संस्थेचे सचिव प्रा. के एस बंदी व समन्वयक डॉ. व्ही एम सेवलीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# डॉ. रसाळ यांच्या हस्ते समीर वाघ यांचा सत्कार

पंचवटी, ता. ३१ : राज्यातील विनाअनुदानित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये असोसिएशन अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांचा महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे अधिष्ठाता (कृषी) व संचालक शिक्षण डॉ. पी. एन. रसाळ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी धुळे कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सी. डी. देवकर, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे उद्यानविद्या विभागाचे विभागप्रमुख डॉ. एस. ए. रनपिसे, तांत्रिक अधिकारी डॉ. आर. पी. आंधळे, सहाय्यक रजिस्ट्रार एच. डब्ल्यू. सोनार, कार्यालय अधिष्ठाता डी. बी. भोसले, संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी व समन्वयक डॉ. व्ही. एम. सेवलीकर आदी उपस्थित होते. त्यांच्या बिनविरोध निवडीबद्दल मान्यवरांतर्फे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

विनाअनुदानित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तिन्ही राज्यस्तरीय नोंदणीकृत संस्था आहे. विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये २५०, विनाअनुदानित तंत्रनिकेतनचे २०२ आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयाचे ९६ इतक्या महाविद्यालयांची सभासद संख्या आहे.

# वाघ महाविद्यालयात राष्ट्रवंदना उपक्रम

▶▶ नाशिक । दि. २४ प्रतिनिधी




'क्रीडा भारती' या राष्ट्रीय संघटने मार्फत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून माँ भारती की अभिनय अर्चना, क्रीडा भारती के साथ राष्ट्र की प्रदक्षिणा एक साथ एक समय! ही अभिनव प्रदक्षिणा कार्यक्रम नुक्ताच के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर आयोजित करण्यात आला होता.

प्रमुख पाहुणे म्हणून स्माईल अँण्ड स्पिनॅच एक्सलेन्स संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ यांच्या हस्ते छत्रपती पुरस्कार विजेते साहेबराव पाटील, श्रध्दा नालमवार, क्रीडा अधिकारी अविनाश टिळे, महेश पाटील, संदीप ढाकणे, राजेश क्षत्रिय प्राचार्य डॉ.केएन नांदूरकर, भाजपच्या सोनाली कुलकर्णी, उपाध्यक्ष स्नेहल देव, विनोद शिरभाते, संजय पाटील आदी मान्यवरांचा स्वागत व सत्कार करण्यात आला. एकाच दिवशी एकाच वेळेस संपूर्ण देशात सुमारे २२५ ठिकाणी युवकांची दुचाकी रॅली काढण्यात आली. रॅली मध्ये ३०० हून अधिक तरुणाईने उत्स्फूर्त सहभाग घेतला. ही रॅली दुचाकीवरुन मालेगाव, चांदवड, पिंपळगाव व नाशिक या ठिकाणा येथून पार पडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.व्ही एस कलमाणी यांनी केले. एस.पी.क्षिरसागर, सुनील निरगुडे यांचे सहकार्य लाभले.

# क्रीडा भारतीतर्फे राष्ट्रवंदना उपक्रम उत्साहात

## ३०० दुचाकीस्वार; ७५ सायकलिस्टंचा उत्स्फूर्त सहभाग

सकाळ वृत्तसेवा

पंचवटी, ता. २३ : के. के. वाघ शिक्षण संस्था व क्रीडा भारती यांच्यातर्फे 'क्रीडा भारती' या राष्ट्रीय संघटनेमार्फत देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहे. या पार्श्वभूमीवर अमृत महोत्सवाचा एक भाग म्हणून 'माँ भारती की अभिनय अर्चना, क्रीडा भारती के साथ राष्ट्र की प्रदक्षिणा एक साथ... एक समय' हा अभिनव प्रदक्षिणा कार्यक्रम सकाळी के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर पार पडला.

प्रमुख पाहुणे स्माईल अॅन्ड स्पिनॅच एक्सलेन्स संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ यांच्या हस्ते छत्रपती पुरस्कार विजेते साहेबराव पाटील, श्रद्धा नालमवार, साहेबराव पाटील, क्रीडाधिकारी अविनाश टिळे, महेश पाटील, संदीप ढाकणे, राजेश क्षत्रिय, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, भाजपच्या सोनाली कुलकर्णी, उपाध्यक्ष स्नेहल देव, विनोद शिरभाते, संजय पाटील आदींचा सत्कार करण्यात आला. क्रीडा भारतीचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमावेळी अजिंक्य वाघ यांनी मार्गदर्शन केले.

एकाच दिवशी एकाच वेळेस संपूर्ण देशात सुमारे २२५ ठिकाणी युवकांची दुचाकी रॅली काढण्यात आली. रॅलीत ३०० हून अधिक तरुणाईने उत्स्फूर्त सहभाग घेतला. ही रॅली दुचाकीवरून मालेगाव, चांदवड, पिंपळगाव व नाशिक या ठिकाणा येथून पार पडली. अनुक्रमे तुकाराम मांडवडे, कल्पेश शिंदे, अमोल पवार, सारंग नाईक व पवन खोडे यांनी रॅलीचे समन्वयक म्हणून कामकाज पाहिले. यात विविध गट त्र्यंबकेश्वरच्या दिशेने, तर दुसरा गट पिंपळगाव. येथून नाशिकच्या दिशेने सहभागी झाला. विविध ठिकाणी रॅलीचे स्वागत करण्यात येणार आहे. प्रत्येक समूह ७५ किलोमीटरचे अंतर दुचाकीवरून पूर्ण करून एक अखंड शृंखला पूर्ण केली. दुचाकी रॅलीच्या सर्वांत पुढे भारत मातेची प्रतिमा आणि राष्ट्रध्वज आदींचा समावेश होता.

प्रदक्षिणेत विशेष म्हणजे कोणतीही स्पर्धा न घेता, खेळांचा प्रसार-प्रचार, क्रीडा भारतीचे संस्कार आणि राष्ट्रवंदनाची भावना व्यक्त करणे हा सोहळ्याचा मुख्य उद्देश आहे. यात सर्व क्रीडाप्रेमी, युवकांनी सहभाग नोंदवत राष्ट्रप्रति प्रेम व्यक्त केले. प्रा. व्ही. एस. कलमाणी यांनी सूत्रसंचालन केले.

Lokmat Times

# Meritorious students honoured

**LOKMAT NEWS NETWORK**
NASHIK, MAY 22

The annual prize distribution ceremony was recently held at KK Wagh Engineering College. On this occasion, 80 meritorious students were honoured for their outstanding performance in various competitions.

The chief guest for the occasion was alumni of the college and CEO of a renowned industry in Mumbai Shirish Vaidya.

Dhanashree Bhor, a final year student of Electrical Department, was declared as the Best Out-going student of the year 2020-21.

Every year, the college honours students who have secured first position in their department and also have participated and won various competitions.



Student being felicitated by dignitaries.

Speaking on the occasion Shirish Vaidya spoke about opportunities and challenges in the industrial sector.

The programme was presided over by Principal Dr Keshav Nandurkar.

आपलं महानगर | My महानगर .com

# के. के. वाघ अभियांत्रिकीमध्ये राष्ट्रवंदना उपक्रम

नाशिक । क्रिडा भारती या राष्ट्रीय संघटनेमार्फत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त माँ भारती की अभिनय अर्चना, क्रिडा भारती के साथ राष्ट्र की प्रदक्षिणा एक साथ....एक समय! ही अभिनव प्रदक्षिणा कार्यक्रम रविवार (दि.२२) रोजी सकाळी ८.५६ वाजता के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर पार पडला. एकाच दिवशी एकाच वेळेस संपूर्ण देशात सुमारे २२५ ठिकाणी युवकांची दुचाकी रॅली काढण्यात येणार आहे. त्यात तरुणाईने उत्स्फूर्त सहभाग घेतला. नाशिकचे क्रीडा भारतीचे विनोद शिरभाते व जिल्हा मंत्री संजय पाटील यांनी या कार्यक्रमाचे संयोजक म्हणून जबाबदारी सांभाळली. यावेळी के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, स्माईल अँण्ड स्पिनॅच एक्सलेन्स संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ, क्रिडा भारतीचे पदाधिकारी व आदी मान्यवर उपस्थित राहणार होते. राज्यभरातील सुमारे १५ हजार युवक-युवती यात सहभागी झाले. १५ हजार किलोमीटर अंतर पार करतील. तसेच प्रत्येक समुह ७५ किलो मीटरचे अंतर दुचाकीवरुन पुर्ण करत एक अखंड शृंखला तयार केली. दुचाकी रॅलीच्या सर्वात पुढे भारत मातेची प्रतिमा आणि राष्ट्रध्वज आदींचा समावेश राहिला.

AaplaMahanagar Edition
May 23, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

लोकमत

# यश निवड

## वाघ इंजिनिअरिंग अभ्यास मंडळावर जातेगावकर

नाशिक : सावित्रीबाई फुले पुणे



विद्यापीठाने क. का. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन आणि रिसर्च नाशिक (स्वायत्त)च्या अभ्यास मंडळांवर कुलगुरू नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. त्यात इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशनमध्ये विशाल जातेगांवकर यांची निवड झाली.

Hello Nashik
Page No. 2 May 14, 2022
Powered by: erelego.com

# के.के. वाघ इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट अभ्यास मंडळात विशाल जातेगावकर

**नाशिक :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन अॅन्ड रिसर्च (स्वायत्त) च्या ११ विविध अभ्यास मंडळावर कुलगुरू नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्त्या केल्या आहेत. त्यात इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन या विषयासाठी प्रा. विशाल जयप्रकाश जातेगावकर यांचा समावेश आहे. उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी तीन वर्षांसाठी ही नियुक्ती असल्याचे पत्र पाठवले आहे. प्रा. जातेगावकर यांचे बी. कॉम, एमबीए असे शिक्षण झाले असून ते टाइम इन्स्टिट्यूटचे संचालक आहेत. नाशिक आणि नाशिक रोड येथे शाखा आहे. पदवीधर विद्यार्थ्यांना करियरसाठी समुपदेशन केले जाते.



विशाल जातेगावकर

# वाघ अभ्यास मंडळावर जातेगावकर

**नाशिक ।** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने का. का. वाघ इन्स्टिट्यूट



ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन आणि रिसर्च नाशिक (स्वायत्त)च्या ११ विविध अभ्यास मंडळांवर कुलगुरू नामनिर्देशित सदस्य म्हणून मान्यवरांच्या नियुक्त्या केल्या असून त्यात इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन या विषयासाठी विशाल जातेगावकर यांचा समावेश आहे. तीन वर्षांसाठी ही नियुक्ती असल्याचे विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आलेल्या पत्रात म्हटले आहे. जातेगावकर हे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि सावाना सदस्य जयप्रकाश जातेगावकर आणि नामकोच्या ज्येष्ठ संचालिका राजनी जातेगावकर यांचे चिरंजीव आहेत. अभ्यास मंडळावरील नियुक्तीबद्दल त्यांचे विभागप्रमुख प्रो. डॉ. चांदवडकर यांच्यासह सहकाऱ्यांनी स्वागत केले.

# वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशीप

**नाशिक । दि. ११ प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने के के वाघ महाविद्यालय व एबीबी कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने फॅक्टरी डिजिटलायझेशनला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल एक्स्पो कार्यक्रमामध्ये इंटर्नशीप करण्याची संधी प्राप्त करुन दिली. यात



महाविद्यालयातील शर्वरी फासे (इलेक्ट्रिक विभाग), सोहेल अन्सारी (मेकॅनिकल विभाग), साईराज दीक्षित (कॉम्प्युटर विभाग) आणि रीतेश बोरसे (आयटी विभाग) या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांना एबीबीचे सिबीन व मनोज वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. प्रक्रियेत एबीबीचे एचआर प्रमुख दयानंद कुलकर्णी यांचे देखील सहकार्य लाभले. अध्यक्ष समीर वाघ, प्रा के एस बंदी, डॉ के एन नांदुरकर, डॉ. एस एस साने, डॉ बी ई कुशारे, डॉ पी डी भामरे, प्रा एम मुरुगकर, डॉ पी जे पवार व डॉ. पी के शहाबादकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# वोक्हार्ट हॉस्पिटलचा परिचारिका दिन

लोकमत

# वाघ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना संधी

**नाशिक** : के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने के. के. वाघ महाविद्यालय व एबीबी कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने फॅक्टरी डिजिटलायझेशनला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल एक्स्पो कार्यक्रमामध्ये इंटर्नशीप करण्याची संधी प्राप्त करून दिली. यात महाविद्यालयातील शर्वरी फासे, सोहेल अन्सारी, साईराज दीक्षित आणि रीतेश बोरसे या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांनी तीन महिने इंटर्नशिपच्या काळात उद्योग ४.० च्या दिशेने फॅक्टरी डिजिटलायझेशनला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल एक्स्पो मध्ये लाईव्ह प्रोजेक्टमध्ये काम करून नवनवीन संकल्पना समजून घेतल्या. यशस्वी इंटर्नशीप पूर्ण करणाऱ्या विद्यार्थी यांना प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देण्यात आली. या काळात विद्यार्थ्यांना एबीबीचे सिबीन व मनोज वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यार्थ्यांच्या कामकाजाबाबत एबीबीचे प्लांट प्रमुख गणेश कोठावदे यांनी समाधान व्यक्त केले. या प्रक्रियेत एबीबीचे एचआर प्रमुख दयानंद कुलकर्णी यांचेदेखील सहकार्य लाभले.

या उपक्रमाबद्दल अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, विभाग प्रमुख डॉ. एस. एस. साने, डॉ. बी. ई. कुशारे, डॉ. पी. डी. भामरे, प्रा. एम. मुरुगकर, डॉ. पी. जे. पवार व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

Hello Nashik
Page No. 3 May 11, 2022
Powered by: erelego.com

आपलं महानगर | My महानगर.com

# QUICK न्यूज



## के. के. वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशीपची संधी

**नाशिक ।** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने के. के. वाघ महाविद्यालय व एबीबी कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने फॅक्टरी डिजिटलायझेशनला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल एक्स्पो कार्यक्रमामध्ये इंटर्नशीप करण्याची संधी प्राप्त करुन दिली.

यात महाविद्यालयातील शर्वरी फासे (इलेक्ट्रिक विभाग), सोहेल अन्सारी (मेकॅनिकल विभाग), साईराज दिक्षित (कॉम्पुटर विभाग) आणि रीतेश बोरसे (आयटी विभाग) या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या काळात विद्यार्थ्यांनी तीन महिने इंटर्नशिपच्या काळात उद्योग ४.० च्या दिशेने फॅक्टरी डिजिटलायझेशनला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल एक्स्पोमध्ये लाईव्ह प्रोजेक्टमध्ये काम करुन नवनवीन संकल्पना समजून घेतल्या केले. यशस्वी इंटर्नशीप पुर्ण करणाऱ्या विद्याध्यांना प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देण्यात आली. याकाळात विद्यार्थ्यांना एबीबीचे सिबीन व मनोज वाघ यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच विद्यार्थ्यांच्या कामकाजाबाबत एबीबीचे प्लांट प्रमुख गणेश कोठावदे यांनी समाधान व्यक्त केले. या प्रक्रियेत एबीबीचे एचआर प्रमुख दयानंद कुलकर्णी यांचे देखील सहकार्य लाभले.

# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची संधी

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने के. के. वाघ महाविद्यालय व एबीबी कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने फॅक्टरी डिजिटलायझेशनला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल एक्स्पो कार्यक्रमामध्ये इंटर्नशिप करण्याची संधी प्राप्त करून दिली. यात महाविद्यालयातील शर्वरी फासे (इलेक्ट्रिक विभाग), सोहेल अन्सारी (मेकॅनिकल विभाग), साईराज दीक्षित (कॉम्पुटर विभाग) आणि रीतेश बोरसे (आयटी विभाग) या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या काळात विद्यार्थ्यांनी तीन महिने इंटर्नशिपच्या काळात उद्योग ४.0 च्या दिशेने फॅक्टरी डिजिटलायझेशनला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल एक्स्पोमध्ये लाइव्ह प्रोजेक्टमध्ये काम करून नवनवीन संकल्पना समजून घेतल्या. यशस्वी इंटर्नशिप पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देण्यात आली. या काळात विद्यार्थ्यांना एबीबीचे सिबीन व मनोज वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यार्थ्यांच्या कामकाजाबाबत एबीबीचे प्लांटप्रमुख गणेश कोठावदे यांनी समाधान व्यक्त केले. या प्रक्रियेत एबीबीचे एचआरप्रमुख दयानंद कुलकर्णी यांचेदेखील सहकार्य लाभले.

पुढारी

# वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना संधी

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने महाविद्यालयात डिजिटल एक्स्पो कार्यक्रमामध्ये इंटर्नशीप करण्याची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त करून देण्यात आली.

यात महाविद्यालयातील शर्वरी फासे (इलेक्ट्रिक), सोहेल अन्सारी (मेकॅनिकल), साईराज दीक्षित (कॉम्प्युटर) आणि रितेश बोरसे (आयटी) या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यशस्वी इंटर्नशीप पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देण्यात आली.

संस्थेचे समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Nashik Edition
May 11, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## वाघ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची संधी

**पंचवटी :** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने महाविद्यालय व एबीबी कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल एक्स्पो कार्यक्रमामध्ये इंटर्नशिप करण्याची संधी प्राप्त झाली आहे. शर्वरी फासे (इलेक्ट्रिक विभाग), सोहेल अन्सारी (मेकॅनिकल विभाग), साईराज दीक्षित (कॉम्प्युटर विभाग) आणि रितेश बोरसे (आयटी विभाग) या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यशस्वी इंटर्नशिप पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देण्यात आली. या काळात विद्यार्थ्यांना एबीबीचे सिबीन व मनोज वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यार्थ्यांच्या कामकाजाबाबत एबीबीचे प्लांट प्रमुख गणेश कोठावदे यांनी समाधान व्यक्त केले. प्रक्रियेत एबीबीचे एचआर प्रमुख दयानंद कुलकर्णी यांचेही सहकार्य लाभले. उपक्रमाबद्दल अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने, डॉ. बी. ई. कुशारे, डॉ. पी. डी. भामरे, प्रा. एम. मुरुगकर, डॉ. पी. जे. पवार व ट्रेनिंग अँन्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

आपलं महानगर | My महानगर.com



# के. के. वाघ अभियांत्रिकीत प्रदर्शन

**नाशिक ।** कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेच्या के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयातर्फे 'कनेक्टींग द डॉट्स' चित्रप्रदर्शन भरवण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता आणि नाविन्यपूर्णतेला चालना देण्यासाठी महाविद्यालयातर्फे नुकतेच प्रकल्प प्रदर्शन घेण्यात आले. यावेळी महाराष्ट्र सीआयआयचे चेअरमन श्रीराम नारायणन, महाराष्ट्र सीआयआयचे व्हाईस चेअरमन रॉबिन बॅनर्जी, महाराष्ट्र सीआयआयच्या नाशिक विभागाचे चेअरमन मनोज देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. एम. बी. ए. विभागातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे समन्वय व आयोजन केले. विकसीत भारत घडविण्याकरिता अशा प्रकल्पना प्रोत्साहित करणारे हे एक महत्वपूर्ण पाऊल असल्याचे मान्यवरांनी म्हटले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ .केशव नांदूरकर व दिप्ती नाखले यांनी मार्गदर्शन केले.